सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## अल्पसंख्याक विकास विभाग,

रुम नं.७१५, ७ वा मजला (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

(दूरध्वनी क्र.०२२-२२८३००३१ ) (ई-मेल : desk5.mdd-mh@gov.in)

क्रमांक : मौआम-२०२२/प्र.क्र.१०० / का.५ दि. १९ जानेवारी, २०२३

प्रति,

**संचालक,**
माहिती तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई.

19/01/2023

**विषय:** मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक (गट-अ) हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई या कार्यालयात २ वर्षाच्या कालावधीसाठी व्यवस्थापकीय संचालक (गट-अ) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची आहे. सदर पदावर नियुक्ती करण्यासाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यासाठी सोबत जोडलेली जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) **" नवीनतम संदेश/संदेश फलक/ रोजगार"** या सदराखाली दि. २०.०१.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

(मं.प.कुंडतरकर)
अवर सचिव

सोबत : वरीलप्रमाणे.

**प्रत,**

कार्यासन-५, संग्रहार्थ.

# महाराष्ट्र शासन
# अल्पसंख्याक विकास विभाग
# जाहिरात

मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई या कार्यालयाचे दिनांक २४ सप्टेंबर २०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियम २०१६ च्या तरतूदीनुसार शासनाच्या उप सचिव किंवा सहसचिव किंवा शासनाच्या सेवेतील अन्य समकक्ष संवर्गातील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळावर व्यवस्थापकीय संचालक (गट-अ) या पदावर नियुक्ती करावयाची आहे. सदर पदासाठीच्या अर्हता/अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत -

**अर्हता :-**

१) संबंधित अधिकारी शासनाच्या उप सचिव दर्जापेक्षा कमी नसलेला किंवा समकक्ष दर्जाचा अधिकारी ( तो कार्यरत असलेल्या पदाचे वेतनस्तर सातव्या वेतन आयोगानुसार एस-२५ पेक्षा कमी नसावे.)

**इतर अटी व शर्ती**

अ) मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळावर व्यवस्थापकीय संचालक पदावर नियुक्त होणारा अधिकारी हा अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असेल.

ब) व्यवस्थापकीय संचालक (गट-अ) या पदाच्या प्रथम प्रतिनियुक्तीचा/नियुक्तीचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून २ वर्ष असा असेल. शासनास सदर कालावधी पुढे दोन वर्षापर्यंत वाढविता येईल.

क) पदावर नियुकती झाल्यानंतर अधिकाऱ्यास मूळ संवर्गातील नियमित वेतनश्रेणीतील वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील.

वर नमूद केल्याप्रमाणे व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ या पदावर काम करण्यास इच्छूक अधिकाऱ्यांकडून दि.२०.०२.२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यत अवर सचिव (का.५), अल्पसंख्याक विकास विभाग, खोली क्र.७१४, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तारित), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे ई-मेल क्र.desk5.mdd-mh@gov.in/ टपालाने/ कुरिअरने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अपूर्ण आणि विहित दिनांक व वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जजाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

प्राप्त अर्जांचे मूल्यमापन करुन, आवश्यकता भासल्यास मुलाखती घेऊन पात्र अधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल.

सही-/

**उप सचिव,**
**अल्पसंख्याक विकास विभाग**

## मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक (गट-अ) या पदासाठी इच्छूक अधिकाऱ्यांकडून नावे मागविण्यासाठीच्या अर्जाचा नमूना

**फोटो**

१ नाव :

२ सध्याचे पदनाम व वेतनस्तर:

३ सध्याचा निवासी पत्ता :

४ जन्मदिनांक :

५ कार्यालयाचे नाव व पत्ता :

६ अर्जाच्या दिनांकाच्या वेळी वय :

७ भ्रमणध्वनी क्रमांक :

८ दूरध्वनी क्रमांक :

९ ई-मेल :

१० कायमचा मूळ पत्ता :

११ शैक्षणिक पात्रता :

१२ राज्य/केंद्र शासनातील कामाचा अनुभव :

| अ.क्र | पदाचे नाव | विभाग | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |

१३ मुल्यांकन अहवाल/गोपनीय अहवाल (लगतच्या ५ वर्षाचे) :

| अ.क्र. | वर्ष | प्रतवारी |
|---|---|---|

१४ भाषेचे ज्ञान आहे किंवा नाही याबाबतची माहिती (होय/नाही) :

| भाषा | लिहिणे | वाचणे | बोलणे |
|---|---|---|---|
| मराठी | - | - | - |
| हिंदी | - | - | - |
| इंग्रजी | - | - | - |
| उर्दू | - | - | - |

१५ सेवाकाळातील कोणतीही विभागीय चौकशी,फौजदारी प्रकरण, लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरण, न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणतीही कार्यवाही : प्रलंबित/ चालू असल्यास त्याबाबतचा तपशील :

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# घोषणा

मी श्री/श्रीमती.............................. असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने/नियुक्तीने भरावयाचा पदाच्या मागणी पत्रातील तपशील वाचले असून, सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीसाठी/नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

सही......................................

नाव.......................................

पदनाम..................................